दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजय भांगे मो.नं. ९४२२६६००७७
बीड/महाराष्ट्र | शुक्रवार १० मे २०२४ | आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ | वर्ष १ ले | अंक २६६ | पाने ४ | किंमत ४ रुपये

# त्या दिवशी महाराष्ट्रातील सरकार पडेल नाना पटोले यांचं सर्वात मोठं विधान



**वादळवार्ता/प्रतिनिधी**

निवडणुकीच्या तोंडावर काही गोष्टी अंगावर येऊ नये. म्हणून मराठा आरक्षणासंदर्भात सत्तेचा उपयोग करत पोलीस रिपोर्ट अशा पद्धतीचा आणला गेला. निवडणुकीच्या तोंडावर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न आहे का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. ही घटना सहा सात महिन्यापूर्वीची असताना निवडणुकीच्या तोंडावर हा विषय काढला हे संशयास्पद आहे. विधानसभेचे अधिवेशन होऊ घातलं होत ते होणार की नाही होणार? कारण 4 जूनला निकाल आल्यानंतर महाराष्ट्रातील सरकार पडेल. पण या प्रश्नाची फेर तपासणी व्हावी अशी मागणी काँग्रेसच्या वतीने करत आहे, असं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटलं आहे. ते नागपुरात माध्यमांशी बोलत होते.पटोलेंचे भाजपवर गंभीर आरोपभाजप निवडणूक हरत असल्यामुळे बूथ कॅपचर चे प्रमाण देशात मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. भाजपच्या नेत्याच्या पोरांनी गुजरातमध्ये सरकार असल्यामुळे बूथ कॅप्चरिंग करून स्वतः इन्स्टाग्रामवर टाकलं. लोकशाहीचा गळा घोटण्याचा काम भाजप करत आहे. निवडणूक आयोगाने तात्काळ याची दखल घ्यावी. अशी मागणी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे, असं नाना पटोलेंनी सांगितलं.नाना पटोलेंचं आश्वासन काय? देशातील वातावरण राहुल गांधींच्या नेतृत्वात गॅरेंटी वॉरंटी सहित दिली आहे. भाजप विरोधात प्रचंड चीड लोकांमध्ये आहे. बदलाचे वारे देशभरामध्ये सध्या पाहायला मिळत आहे. आज जगात भारत हा युवकांचा देश म्हणून नावलौकिक आहे. बेरोजगार करण्याचा पाप नरेंद्र मोदी आणि भाजप सरकारने केलं. त्यामुळे युवकांना न्याय देण्याची भूमिका ही काँग्रेसची प्राथमिकता असणार आहे. अग्नि योजना बंद करून रेगुलर मिल्ट्रीची भरती करून देशातील तरुण आणि तरुणींना लढण्याचा आणि संधी देण्याचे काम काँग्रेस करणार आहोत. पेपर लीक होण्याचा जे प्रमाण आहे, त्याला रोखण्यासाठी जन्मठेप करण्याची शिक्षा कायद्याचं रूपांतर करून आमच्या सरकार आल्यावर करू, असं म्हणत पटोलेंनी लोकांना आश्वस्त केलं महाराष्ट्रात 108 नंबरची ॲम्बुलन्स रुग्णांसाठी चालवली जाते. याची सुरुवात काँग्रेसने केली होती. त्याला एक्सटेन्शन देण्यासाठी दहा हजार कोटीचा भ्रष्टाचार महाराष्ट्रातील एकनाथ शिंदे आणि फडणवीस सरकारने केलेला आहे. सामान्य रुग्णांना वेळेवर उपचार मिळू नये आणि ते तडफडत मरावे. ब्लॅक लिस्ट कंपन्यांना सरकारने काम दिलं आहे, असंही नाना पटोले म्हणाले..

## कपाळावर हवं, 'मेरा बाप महा गद्दार', शिवसेना नेत्याचा हल्लाबोलपूर्ण फिरली आहे

ठाकरे गटाच्या खासदार प्रियंका चतुर्वेदी यांच्या वक्तव्यावरुन एक मोठा वाद निर्माण झाला आहे. त्यांच्या या वक्तव्याला आता शिवसेना शिंदे गटाकडून प्रत्युत्तर दिलं जात आहे. अत्यंत बोचऱ्या शब्दांचा वापर करताना प्रसंगी व्यक्तीगत



पातळीवरची टीका केली जात आहे. प्रियंका चतुर्वेदी या महाविकास आघाडीचे उमेदवार संजय दीना पाटील यांच्या प्रचारासाठी आयोजित सभेत बोलत होत्या. "एकनाथ शिंदे कोण आहेस तू? कोण आहेस तू? म्हणून मोठ्याने ओरडत होत्या. समोरची गर्दी गद्दार, गद्दार ओरडत होती. ठाण्यापर्यंत हा आवाज पोहोचला पाहिजे. गद्दार गद्दारच राहणार" असं त्या म्हणाल्या.

## "शिव उद्योग स्वराधिश 1.0 कराओके राज्यस्तरीय स्पर्धा"शिव उद्योग संघटना आणि मराठी साहित्य व कला सेवा देणार नवोदित गायकांना संधी

मुंबई (गुरुदत्त वाकदेकर) : प्रत्येकाच्या हाताला काम हा एकच ध्यास घेऊन देशात कार्यरत असणारी "शिव उद्योग संघटना" आणि मराठी साहित्य आणि कला क्षेत्रात नवोदितांना हक्काचं व्यासपीठ मिळवून देण्यासाठी कार्यरत असणारी "मराठी साहित्य व कला सेवा" यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यभरातील गायकांसाठी एक सर्वोत्तम संधी अर्थात "शिव उद्योग स्वराधिश १.० कराओके राज्यस्तरीय स्पर्धा" जाहीर करण्यात आली आहे. तीन फेऱ्यांमध्ये रंगणाऱ्या ह्या स्पर्धेसाठी १६ ते ५० वयोगटातल्या स्पर्धकांना सहभाग नोंदवता येईल. नावनोंदणीची




अंतिम तारीख २५ मे २०२४ आहे. स्पर्धा शुल्क ₹३००/- आहे. स्पर्धेची अंतिम फेरी मुंबई येथे १३ जुलै २०२४ होणार आहे. स्पर्धेच्या विजेत्यांना रोख रकमेसोबतच, आकर्षक सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह प्रदान करण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी गुरुदत्त वाकदेकर ९९८७७४६७७६ ह्या क्रमांकावर संपर्क साधू शकता.

## कुठेही गेले तरी फक्त तुतारी.चा च आवाज! निवडणुक आता पूर्ण फिरली आहे

माजलगाव प्रतिनिधी.. गेला काही दिवसा पासून बीड लोकसभा मतदारसंघातील निवडणुकीचा प्रचंड चढत उतार होत आहे. सर्वत्र फक्त तुतारी चा च वाजत दिसत आहे असे चित्र निर्माण झाले आहे.ताई सैरभैर दिसत आहेत. तर बजरंग सोनवणे शांततेत आपला प्रचार करत आहेत. नम्र आणि शांत पणे लोकांना आपल्याकडे वळवत आहेत. दहा वर्ष जनतेने ताई अहंकार सहन केला. मात्र एक सुशिक्षित तरुण व शोत करी अतिशय प्रेमाने बोलतो आपल्या समस्या समजून घेतो त्या सोडविण्याचे आश्वासन देतो. हे सर्व लोकांना प्रचंड भारावून टाकत आहे. हाच शोत करी मुलगा आता येणाऱ्या काळात नेतृत्व करेल हा विश्वास निर्माण झाला आहे. बजरंग सोनवणे हे वेगळे रसायन आहे. त्या माणसाला या लोकांसाठी काहीतरी करायचे आहे. त्याचसाठी तो माणूस रात्रंदिवस फिरत असताना जराही थकलेला वाटत नाही. कुणावर टीका नको की चिडचिड नको ताईचा अहंकार आणि बजरंग सोनवणे यांचा नम्र स्वभाव यापैकी जनतेने आता बजरंग सोनवणे निवडले आहेत. परिवर्तन निश्चित आहे. फक्त किती मतांनी बजरंग सोनवणे विजयी होणार

## माजलगावात बजरंग बप्पां साठी इंडिया आघाडीच्या रॅलीला उस्फुर्त प्रतिसाद.


महाविकास आघाडीचे बीड लोकसभेचे उमेदवार बजरंगबप्पा सोनवणे यांच्या समर्थनार्थ माजलगाव शहरात इंडिया आघाडीच्या वतीने गुरुवारी , सकाळी रॅली काढण्यात आली. माजी नगराध्यक्ष शेख मंजूर, शहराध्यक्ष शकील कुरेशी यांच्या आयोजित रॅलीला शहरात मोठा प्रतिसाद मिळाला.दरम्यान रॅलीमधील पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी मतदारांना बजरंगबप्पा सोनवणे यांना मतदान करण्याचे आवाहन केले. महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंगबप्पा सोनवणे यांच्या समर्थनार्थ माजलगाव शहरात गुरुवार दि.9 रोजी सकाळी रॅली काढण्यात आली.छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे ध्वजाला अभिवादन करून रॅलीची सुरुवात करण्यात आली.दरम्यान शहरातील बीड रोडवरील सर्व दुकानदारांना बीड लोकसभेचे उमेदवार बजरंगबप्पा सोनवणे यांच्या तुतारी चिन्हावर मतदान करण्याचे आवाहन केले.रॅलीत तुतारी वादक युवकाचा सहभाग होता, त्याचप्रमाणे तुतारीचे फलक कार्यकर्त्यांनी उंचाऊन घोषणाबाजी केली.मतदार,दुकानदारासह पादचारी नागरिकांना पत्रक वाटले. दरम्यान डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथील निळ्या ध्वजालाही अभिवादन करण्यात आले.रॅलीचा समारोप झेंडा चौक येथे करण्यात आला.यावेळी अनेक मान्यवरांनी विचार व्यक्त करून बजरंगबप्पा सोनवणे यांना प्रचंड मतांनी निवडून आणण्याचे आवाहन केले

# पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी माजलगावांत

## सभेला मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे महायुतीचे आवाहन; गडकरींच्या सभेने पंकजाताईच्या विजयी मताधिक्यात होणार वाढ !

**(माजलगाव प्रतिनिधी)**

भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ केंद्रीय मंत्री विकासपुरुष नितीन गडकरी यांची माजलगाव येथे उद्या शुक्रवारी दुपारी जाहीर सभा होणार आहे. या जाहीर सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भाजपा महायुती प्रचार समितीच्या वतीने करण्यात आले आहे. भाजप महायुतीच्या बीड लोकसभा मतदारसंघाच्या लोकप्रिय उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांची सुरुवातीपासूनच प्रचारात प्रचंड आघाडी घेतलेली असुन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचीही पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारासाठी अंबाजोगाई येथे सभा झाली. त्यानंतर आता माजलगाव येथे विकासपुरुष केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे खास पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारासाठी येत आहेत. शुक्रवार, दि. १० मे २०२४ रोजी दुपारी १२:०० वा.जुना मोंढा,येथे ही सभा होणार आहे. "सबका साथ सबका विकास" सूत्र डोळ्यासमोर ठेऊन, गरीब कल्याणाचा रथ मोदी सरकारने हाती घेतला.भाजप सरकारच्या मंत्रिमंडळातील कार्यकुशल प्रमुख मंत्री व विकासपुरुष म्हणून ज्यांची ओळख आहे.ज्यांच्या मुळे देशभरात ऐतिहासिक महामार्गांचे महत्त्वकांक्षी प्रकल्प व रस्त्यांचे जाळे निर्माण झाले आहे. नवनवीन विकास संकल्पना कार्यान्वित झाल्या आहेत.असे नितीन गडकरी हे पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारासाठी बीड जिल्ह्यात येत आहेत. माजलगाव येथे होणारे या जाहीर सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भारतीय जनता पक्ष महायुती प्रचार समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



# अब की बार चारशे पार की टांगा पलटी घोडे फरार!

२०२४ च्या लोकसभा निवडणूकीमध्ये ४०० चा टप्पा ओलांडण्याची भाषा करणारा भारतीय जनता पक्ष आता आपले २५० चे ध्येय सुद्धा वाचविता येते की नाही, अशा चिंतेने ग्रासला आहे. अशा बातम्या विविध समाज माध्यमांतून येत आहेत. असे ही बोलले जात आहे की एनडीए ही युती कसेबसे २७२ पर्यंत पोहोचली तरी गंगेत घोडे न्हाले! असा अंदाज समोर येत आहे. भाजप आपल्याच जाळ्यात अडकत असल्याचे मुद्दे समोर आले आहेत आणि सर्वात मोठी गोष्ट म्हणजे ते वेळोवेळी आपली शैली बदलत आहेत. यामुळे पक्षाने स्वत:चे मतदारही गमावले आहेत, जे त्यांचे समर्पित मतदार होते ज्यांनी नेहमीच त्यांना मतदान केले होते. काही लोक पक्षाविषयी संभ्रमात आहेत की त्यांच्या पक्षाची स्थिती कुठेतरी इतकी कमकुवत आहे की परिस्थिती हाताबाहेर गेली आहे. आपला विजय निश्चित करण्यासाठी भाजपचे लक्ष प्रत्येक जागेवर आहे. त्यासाठी ज्यांना भ्रष्टाचारी म्हणून यांनीच शिक्कामोर्तब केले होते त्यांनाच जवळ करून अधिक महत्त्व दिले जात असल्याने, ज्या पक्षासाठी आम्ही जीव ओतून काम केले आहे, त्या पक्षाला आमच्या भावनांचीही पर्वा नाही, असे अनेक भाजप समर्थक दबक्या आवाजात बोलत आहेत. म्हणून आता असेही बोलले जात आहे कि, भाजपचा अब की बार चारशे पार का टांगा पलटी घोडे फरार! हे लवकरच कळेल.

तसेच २०२४ च्या निवडणुका जिंकण्यासाठी भारतीय राज्यघटना बदलण्याचे षडयंत्र आणि समाजातील दुर्बल घटकांना नोकरी आणि शिक्षणात घटनात्मकरित्या दिलेले आरक्षण संपुष्टात आणण्याचे गुप्त मनसुबे कोणी ना कोणी जाहीररित्या बोलून दाखवतात त्यामुळे संपूर्ण भाजप आपली दलितविरोधी विचारधारा लपवू शकलेली नाही. मोदींची विचारसरणी एकखांबी सरकार स्थापन करण्यावर केंद्रित झाली आहे, हे स्पष्ट आहे. संविधान बदलून समाजातील दुर्बल घटकांना नोकऱ्या आणि शिक्षणातील घटनात्मक आरक्षण संपुष्टात आणण्याचा मुद्दा भाजपच्या अनेक ज्येष्ठ नेत्यांकडून वेगवेगळ्या वेळी उपस्थित केला जात आहे, ज्यामुळे केवळ बाधित घटकांसाठीच नव्हे, तर सवर्ण, बिगर आरक्षण वर्गासाठी मोठी समस्या निर्माण झाली आहे. आरएसएस प्रमुख मोहन भागवत यांचे हैदराबाद येथे केलेले नुकतेच एक वक्तव्य समोर आले आहे. ते म्हणाले आहेत की, आरएसएस सुरुवातीपासूनच आरक्षणाच्या विरोधात नाही.

मोदी या भेटीदरम्यान भागवतांना म्हणाले होते की, तुम्ही आरक्षणाला विरोध करण्याविषयी बोलत असता आणि तुम्ही आर्थिक आरक्षणाबद्दल आग्रही असता. आरएसएसचा आरक्षणाला विरोध नाही असे एकदा म्हणा. यापूर्वीही एकदा असे घडले होते. भागवतांनी २०१५ मध्ये बिहार निवडणुकीच्या तोंडावर असे आरक्षणविरोधी वक्तव्य का केले होते माहित नाही. ते म्हणाले होते आरक्षण धोरणाची चिकित्सा एकदा केलीच पाहिजे. त्याचप्रमाणे २०१६ मध्ये उत्तर प्रदेशच्या निवडणुकीपूर्वीही त्यांनी असेच एक वक्तव्य केले होते. ते आरक्षणाच्या विरोधात अधून मधून विधाने करत असतात; परंतु यावेळी सत्तेचा सोपान गाठण्यासाठी परिस्थिती कठीण आहे. खरे तर येथील जातीव्यवस्थेनुसार भारतात २७ टक्के मागासलेले आहेत. सुमारे ३६ टक्के लोक अत्यंत मागासलेले आहेत. या दोघांची बेरीज सुमारे ६५ टक्के आहे. असुरक्षित लोक सुमारे १५ ते १६ टक्के आहेत. ज्यांना कुठल्याही प्रकारचे आरक्षण मिळत नाही.

या १५ टक्के आरक्षणात आर्थिक आधारावर स्वतंत्रपणे १० टक्के आरक्षण देण्यात आले आहे. मग समस्या अशी आहे की, जर संघ आपल्या विचारधारेवर ठाम राहिला तर या निवडणुकीत या १५ टक्के लोकांशिवाय भाजपला दुसरे कोण विचारणार? २०१५ मध्ये पटेल आरक्षण आंदोलन सुरू असताना भागवतांनी संपूर्ण आरक्षण धोरणाचा पुन्हा आढावा घ्यावा, असे म्हटले होते. पटेल चळवळीचा सर्वाधिक फटका कोणाला बसत होता? मोदींच्या राज्याला. तेथील त्यांची स्थिती सुधारण्यासाठी भागवतांना पुढे करण्यात आले. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या वेळी मोहन भागवतांनी असे विधान केले की, आपण अशा लोकांची एक समिती स्थापन केली पाहिजे जी आरक्षणाचा गांभीर्याने पुनर्विचार करेल आणि या देशात आरक्षणाचे भवितव्य काय असावे याचा अहवाल देईल. या समितीत आरक्षण घेणारे लोक असायला हवेत आणि आरक्षणवाद्यांचा विचार करणारेही लोक असायला हवेत. मुद्दा असा आहे की आरक्षणाचा आढावा घेतला पाहिजे, त्यासाठी एक समिती स्थापन करावी, आरक्षणामुळे समाजात भेदभाव निर्माण होतो, असे त्यांचे विधान आहे. त्यातून समाजात फूट पडते. आणि याचा आपण पुन्हा विचार करायला हवा. नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमधील जातीनिहाय आरक्षण लवकर रद्द करण्यात यावे. सर्वांना समान संधी मिळायला हवी. सर्वांना समान संधी मिळण्याचा अधिकार आहे. आरक्षणामुळे समाजाची दोन भागांत विभागणी होते. त्यामुळे ते रद्द करण्यात यावे. असा तर्क संघ प्रमुखाचा असतो!

जेव्हा जेव्हा निवडणुकांमध्ये हे प्रकरण गुंतागुंतीचे होते तेव्हा मोदी भागवतांना हाक देतात. भागवत आणि मोदी हे मुळी वेगळे नाहीतच. दोघेही लहानपणीचे मित्र आहेत. मोदी संघाचे प्रचारक झाले तेव्हा भागवतांच्या वडिलांनी त्यांना प्रशिक्षण दिले आहे. बराच काळ ते त्यांच्यासोबत राहिले. आरएसएसमध्ये ते गुजरातचे प्रभारी होते. अडवाणींच्या आधी मोदी हे त्यांचे शिष्य होते. त्यांनीच मोदींची अडवाणींशी ओळख करून दिली. आरक्षण बदलले पाहिजे, असे ते सांगत असतात. आता समस्या अशी आहे की १५ टक्केवाल्यांचे राजकारण करावे लागेल. तसेच १५ टक्केवाल्यांचे चांगले काम करावे लागते.

भीमराव सरवदे,
औरंगाबाद,
९४०५४६६४४१

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अत्यंत जवळचा एक नेता आहे, त्यांचे नाव आचार्य प्रमोद कृष्णम, नुकताच त्यांचा एक व्हिडिओ व्हायरल होत आहे ज्यात ते म्हणत आहेत की, या वेळी जर सत्ता आली तर कोणत्याही किंमतीवर जातीय आरक्षण रद्द करण्यात यावे, असा ठराव आम्ही संमत करू. कॉंग्रेसमध्ये असताना थोर समाजसुधारक आणि साधूच्या भूमिकेत दिसलेले प्रमोद कृष्णम भाजपमध्ये प्रवेश करताच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना इतके प्रिय झाले की ते संविधानाने दिलेल्या आरक्षणाच्या विरोधात उभे राहिले आहेत. आचार्य प्रमोद कृष्णम यांच्या निमंत्रणावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी एका मंदिरात पूजा करणार होते. त्यावेळी आचार्य प्रमोद कृष्णम यांनी आपल्या भाषणात म्हटले होते की योगी आदित्यनाथ यांनी केले आहे तसे आरक्षण संपुष्टात आणावे. प्रमोद कृष्णम यांना राज्यघटनेचा तिरस्कार आहे. आचार्य प्रमोद कृष्णम यांच्यासारख्या लोकांनी कॉंग्रेसमध्ये असताना कधीही आपला समाजविघातक चेहरा दाखवला नाही. ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेली व्यवस्था आहे, अशी त्यांची समजूत आहे. हे लोक संधी मिळेल तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान करतात. योगी आदित्यनाथ प्रमोशनमधील आरक्षण संपुष्टात आणत आहेत आणि नरेंद्र मोदी ते मान्य करत आहेत. खरे तर पंतप्रधान नरेंद्र मोदी आरक्षण रद्द करण्याच्या प्रयत्नात सहभागी असलेल्या व्यक्तीच्या प्रयत्नांचे कौतुक करतात. भाजप नेते आणि नरेंद्र मोदी यांच्या जवळच्या मित्रांच्या वक्तव्यांवरून हे स्पष्ट होते की, संविधान बदलून देशाची लोकशाही संपुष्टात आणणे हेच त्यांचे ध्येय आहे. देश चालवण्यात दलित, मागास आणि आदिवासींच्या सहभागाकडे ते दुर्लक्ष करत आहेत.

८५ टक्के जनतेचा विश्वास नसल्याने या निवडणुकीत भाजपची अवस्था वाईट आहे. या देशातील ८५ टक्के जनता कोणत्या ना कोणत्या प्रकारे आरक्षणाचा लाभ घेत आहे, त्यात ६५ टक्के लोक अत्यंत मागास आहेत. या पार्श्वभूमीवर अमित शहा आता म्हणतात की, जर राज्यघटना बदलली तर मी सर्वप्रथम त्याच्या विरोधात उभा राहीन आणि राज्यघटना कधीही बदलू देणार नाही. याचे कारण म्हणजे आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या ८५ टक्के मतदारांना या राज्यघटनेमुळे या देशात सन्मान मिळत आहे. मनूस्मृती हे साध्य करू शकत नाही. राज्यघटनेतून ८५ टक्के जनतेला मिळालेली जी शक्ती आहे त्यावरून असे दिसते की १५ टक्के जनता संकटात आहे.


भारताच्या इतिहासातील पहिले आरक्षण राजर्षी शाहू महाराजांनी १९०२ मध्ये दिले होते. पुढे आरक्षण हे गोलमेज परिषदेत डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या आग्रही मागणीमुळे इंग्रजांकडून आले. तेव्हा गांधीजींनी आमरण उपोषण करून प्रचंड विरोध केला. त्यानंतर पुणे करार झाला. त्यानंतर १९४२ मध्ये इंग्रजांनी पुन्हा आरक्षणावर शिक्कामोर्तब केले. १९४७ मध्ये नवीन राज्यघटना स्वीकारण्यात आली. नव्या राज्यघटनेत मागास जातींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आरक्षणाची तरतूद करण्यात आली. आज आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या समूहाने भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा हेतू ओळखून त्या समूहाचे भाजपबद्दल असे मत तयार झाले आहे की त्यांना संविधान बदलायचे आहे आणि संविधानाऐवजी मनुवादी संविधान आणू इच्छित आहेत. त्यामुळे त्यांच्यावर आता विश्वास राहिलेला नाही. तसेच ८५ टक्के लोकांना यांच्या वारंवार बदललेल्या भूमिका पटलेल्या नाहीत आणि आता तर हे उरलेले १५ टक्के लोकही बेरोजगारी, महागाई आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांविषयी असलेली अनास्था यामुळे त्यांच्याकडे संशयाच्या नजरेने पाहू लागले आहेत. अशा तऱ्हेने निवडणुकीच्या तोंडावर भाजप आणि कंपूची आश्वासने खोटी ठरत आहेत. विविध प्रकारचे अभिप्राय, अंतर्गत सर्वेक्षण व इतर नकारात्मक गोष्टी प्राप्त होत आहेत आणि येऊ घातलेल्या पराजयाची चाहूल लागल्याने हा धोका टाळण्यासाठी मोहन भागवतांना बाहेर यावे लागले आहे. आरक्षणाच्या मुद्द्यावर भागवतांनी तिसऱ्यांदा यू टर्न घेतला आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आपली बैठक बोलावून संविधान बदलू नये या बाजूने ठराव संमत करावा, असे आता भागवत म्हणू लागले आहेत.

उत्तर प्रदेशाच्या बाबतीत बोलायचे झाले तर संविधान बदलण्याचा मुद्दा सध्या संपूर्ण उत्तर प्रदेशात सर्वात महत्त्वाचा मुद्दा बनला आहे. आणि ८५ टक्के लोकांना तर आश्चर्याचा धक्काच बसला आहे की संविधान बदलायचे आहे म्हणून भाजपला "४०० पार" हवे आहे. ८५ टक्क्यांच्या रोषाचा अहवाल भाजप आणि आरएसएसलाही मिळत आहे. त्यामुळेच दुसऱ्या फेरीनंतर आता ४०० पारचा नारा थांबला आहे. संविधान बदलण्याचा आणि आरक्षण रद्द करण्याचा प्रश्न संपूर्ण एससी, एसटी, ओबीसी समाजापर्यंत जनजागृतीच्या अभावाने पोहोचलेला नाही, असे म्हणणे योग्य ठरणार नाही. कारण सगळ्यात आधी आरक्षण जाण्याची भीती आहे. भीती क्षणार्धात व्हायरल होते, दूरपर्यंत पोहोचते. तार्किक विचार करणे आणि समजून घेणे वेगळे आहे. मग तो निवडणूकीचा प्रश्न असो, प्राध्यापकांच्या भारतीसाठीच्या १३ पॉइंट रोस्टरचा प्रश्न असो किंवा एससी, एसटी, ओबीसींच्या आरक्षणाचा प्रश्न असो. आजही संपूर्ण देशात राज्यघटनेविषयी काही आत्मीयता असेल तर ती अनुसूचित जाती समाजात आहे. एक गोष्ट आपण निर्विवादपणे सांगू शकतो की ज्यांना संविधान म्हणजे काय हे माहित नाही याचा अर्थ त्यांच्यापर्यंत संविधान अजून पोहोचलेले नाही, हे खूप मोठे आव्हान आहे. ज्या दिवशी कष्टकरी जनता संविधानात स्वत:ला पाहू लागेल, त्या दिवशी ते पाच किलो रेशनवर अथवा कुठल्या अमिषावर मतदान करणार नाही. तसेही वारंवार टोमणे ऐकल्यानंतर त्यांचा भाजपवरचा पूर्णपणे मोहभंग झाला आहे. आरएसएस आणि भाजपलाही हे लवकर समजले आहे, हे बरेच झाले. म्हणूनच त्यांनी मंगळसूत्र आणि संपत्ती हिसकावून घेतली जाईल असे सांगून या निवडणुकीची सुरुवात केली.

त्यानंतर दुसऱ्याच दिवशी विरोधी पक्ष संविधानाच्या विरोधात जाऊन एससी, एचटी, ओबीसींचे आरक्षण काढून मुस्लिमांमध्ये वाटणार असल्याचे भाजपचे नेते सांगू लागले. सर्वप्रथम, पंतप्रधान नरेंद्र मोदी ते हे विसरले असतील की त्यांना आरक्षणाची चिंता नव्हती, कारण ते मंडलविरोधी, कमंडल चळवळीचे सदस्य होते. एके ठिकाणी पंतप्रधान मोदी म्हणाले होते की, मी जन्मजात ओबीसी आहे. पण त्यांचा जन्म ओबीसींमध्ये झाला नाही. त्यामुळे ओबीसी वर्गाला शतकानुशतके सहन कराव्या लागलेल्या वेदना त्यांना अजिबात माहित नाहीत. कोण संविधानाचे समर्थक आहे, कोण लोकशाहीचे समर्थक आहे, कोण न्यायाचे समर्थक आहेत, न्यायपालिकेची स्थिती काय आहे, हे सर्वानाच ठाऊक आहे. आम्ही 'आरक्षण' हा शब्द काढून टाकू अशा वल्गना भाजपचे अनेक नेते व समर्थक करत असतात. म्हणूनच नरेंद्र मोदी मार्ग काढण्यासाठी एससी, एसटी, ओबीसींना मुस्लिमांची भीती दाखवत आहेत; परंतु आता ती भीती रास्त नाही. ओबीसींमध्ये मुस्लिमांना आरक्षण आधीच उपलब्ध आहे. मंडल आयोगाच्या अहवालातून ही माहिती समोर आली आहे. त्या ३७४३ जातींमध्ये फकीर, सैफी, दुनिया, अन्सारी या मुसलमानांचा समावेश आहे. एक तर पंतप्रधान इथे अपयशी ठरले आहेत व दुसरे, पंतप्रधानांच्या या नाटकीय वर्तनाने सोशल मीडियाच्या माध्यमातून सामाजिक न्यायावर विश्वास ठेवणाऱ्या लोकांना त्यांच्याच विरोधात एकत्र आणण्याचे काम केले आहे. थोडक्यात, या व आगामी निवडणुकीत सर्व काही सुरळीत होईल, असे आता वाटू लागले आहे. यातून आपल्याला मोठा बदल दिसून येऊ शकतो. तसेही वरील बाबी लक्षात घेता संविधान, लोकशाही, धर्मनिरपेक्षता व देशाची अखंडता वाचवण्यासाठी २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत अनुसूचित जाती, जमाती, ओबीसी, शेतकरी आणि अल्पसंख्याक महत्त्वाची भूमिका बजावू शकतात! (लेखक सार्वजनिक क्षेत्रातील निवृत्त वरिष्ठ अधिकारी असून आंबेडकरी व पेरियार चळवळीचे अभ्यासक आहेत.)

# बजरंगबप्पा सोनवणे यांना प्रचंड मतांनी विजयी करा इंदिरानगर येथील कॉर्नर बैठकीत सहाल चाऊस यांचे आवाहन.

माजलगाव प्रतिनिधी
देशात महागाईने उच्चांग गाठला आहे.बेरोजगारांच्या हाताला काम नाही,परंतु भाजप सरकार लोकांना धार्मिक वादात गुंतवून स्वतःची पोळी भाजून घेत आहे अशा, सरकारला खाली खेचण्यासाठी महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंगबप्पा सोनवणे यांना प्रचंड मतांनी विजयी करून लोकसभेत पाठवा असे आवाहन माजी नगराध्यक्ष सहाल चाऊस यांनी इंदिरानगर येथील कॉर्नर बैठकीत केले. माजलगाव शहरातील इंदिरा नगर येथे माजी नगराध्यक्ष सहालभैया चाऊस यांच्या नेतृत्वात महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार शेतकरी पुत्र बजरंग सोनवणे यांच्या प्रचारार्थ कॉर्नर बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी उपस्तिथांन्ना संबोधित केले.यावेळी विधानसभा अध्यक्ष नारायण डक, धारूरचे माजी नगराध्यक्ष अर्जुन गायकवाड,माजी नगरसेवक शिवाजी सुतारसह कार्यकर्ते मोठया उपस्थित होते.यावेळी त्यांनी भाजप सरकारच्या दहा वर्षातील कामकाजावर टीका केली. दरम्यान उपस्थित कॉर्नर बैठकीमध्ये मोठ्या प्रमाणात परिसरातील मतदारांची गर्दी होती.





## बीडमध्ये अपक्ष उमेदवाराचा घोड्यावरून प्रचार सुरू; आगळावेगळा प्रचार ठरतोय चर्चेचा विषय...!

बीड प्रतिनिधी:-
बीड लोकसभा निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात आलाय. अशातच उमेदवार मतदारांपर्यंत पोहोचण्याकरिता वेगवेगळे फंडे आजमावत आहेत. अशातच लोकसभा निवडणुकीतील अपक्ष उमेदवार गणेश करांडे यांनी घोड्यावरून प्रचार सुरू केलाय. प्रचारासाठी शेवटचे तीन दिवस राहिले असून उमेदवारांच्या भेटीगाठी वाढल्या आहेत. बीड लोकसभा निवडणुकीत पंकजा मुंडे बजरंग सोनवणे आणि अशोक हिंगे अशी त्रिशंकू परिस्थिती निर्माण झाली आहे तर एकूण 41 उमेदवार या निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत मात्र गणेश करंडे या अपक्ष उमेदवाराचा प्रचार सध्या चर्चेचा विषय बनलाय आहे.



## जातीय तेढ निर्माण करणाऱ्या रवींद्र गायकवाड यांच्यावर गुन्हा दाखल करा

(आष्टी प्रतिनिधी) भडकाऊ भाषण करून मुस्लिम समाजाच्या भावना दुखावून तसेच जाती धर्माच्या आधारावर मते मागून आदर्श आचार संहितेचा भंग केल्याबद्दल उस्मानाबाद (धाराशिव) येथील माजी खासदार रवींद्र गायकवाड यांच्यावर गुन्हा नोंद करण्यात यावा अशी मागणी आष्टी येथील टिपू सुलतान युवा प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आली आहे. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी बीड यांना दिलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे की, सध्या लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी असून उस्मानाबाद (धाराशिव) लोकसभा मतदार संघाचे घड्याळ चिन्ह घेऊन उभा असलेले अजित पवार गटाचे उमेदवार अर्चना पाटील यांच्या प्रचारार्थ सोमवार दि 6 मे रोजी मतदारसंघातील एका आयोजित प्रचार सभेमध्ये माजी खासदार रवींद्र गायकवाड यांनी मुस्लिम समाजाच्या भावना दुखावतील व जाती धर्मात तेढ निर्माण होईल असे वक्तव्य केले आहे. गायकवाड यांच्या समाजविघातक वक्तव्यामुळे संपूर्ण मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्या आहेत. निवडणुकीत जाती धर्माच्या नावावर मते मागता येत नाही याची पूर्व कल्पना असताना देखील जाणून बुजुन धर्माच्या नावाने मते मागण्याचा प्रयत्न माजी खासदार रवींद्र गायकवाड यांनी घड्याळ चिन्ह करीता केलेलं आहे. जे की आदर्श आचारसंहितेच उल्लंघन करणारे कृत्य आहे. मा.खासदार रवींद्र गायकवाड यांनी केलेल्या असंविधानिक वक्तव्याची गंभीर दखल घेऊन त्यांच्यावर व त्यांच्या पक्षाचे उमेदवार अर्चना पाटील त्यांच्यावर जातीय तेढ निर्माण करून आदर्श आचार संहिता भंग केल्या प्रकरणी कायदेशीर कार्यवाही व्हावी अशी मागणी टिपू सुलतान युवा प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आली आहे.

## पंकजाताई मुंडेंसाठी चौसाळा जिल्हा परिषद गटात पवन कुचेकर डोअर टू डोअर

वादळवार्ता/चौसाळा
बीड लोकसभेच्या भाजपा व महायुतीच्या लोकप्रिय उमेदवार पंकजाताई मुंडे यांना चौसाळा जिल्हा परिषद गटातून मताधिक्य मिळवून देण्यासाठी भारतीय जनता पार्टीचे अनुसूचित जाती मोर्चाचे बीड तालुका अध्यक्ष पवन कुचेकर यांच्यासह भाजपा अल्पसंख्य मोर्चाचे तालुका अध्यक्ष सलीम जहाँगिरदार यांच्यासह भाजपा व महायुतीचे कार्यकर्ते या सर्वांना सोबत घेऊन चौसाळा जिल्हा परिषद गटात पवन कुचेकर डोअर टू डोअर प्रचार करत आहेत.

पंकजाताई मुंडे ह्या ग्रामविकास, जलसंधारण, महिला व बालल्याण मंत्री आणि बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री असताना त्यांनी संपूर्ण बीड जिल्ह्यात विकासासाठी आणलेला निधी, केलेली विकास काम, तसेच शेतकऱ्यांना मिळवून दिलेला पीक विमा, जिल्ह्याच्या सर्वांगीण शाश्वत विकासासाठी केलेली कामे चौसाळा जिल्हा परिषद गटात खेडो पाडी, वाडी, वस्ती, तांड्यावर जाऊन सर्वसामान्य कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर, ऊसतोड कामगार, दलित, बहुजन यांच्यासह सर्वच समाजापर्यंत प्रचाराच्या माध्यमातून डोअर टू डोअर जाऊन भारतीय जनता पार्टीची भूमिका आणि पंकजाताई मुंडे यांनी दिलेले विकास आणि विश्वासाचे वचन हे सर्वसामान्य मतदारांपर्यंत जाऊन लोकांपर्यंत पोहोचवत आहेत.



विरोधकांकडे विकासाचा मुद्दा नसल्याने विरोधक हे प्रत्येक समाजात जाती पातीच्या राजकारनाचे विष पेरण्याचे काम करत आहेत. तसेच आंबेडकरी जनतेला संविधान बदलण्याची खोटी भीती दाखवत आहेत आणि मुस्लिम समाजात भीतीचे वातावरात पसरवत आहेत. परंतु प्रचाराच्या सुरुवातीलाच बीड लोकसभेच्या भाजपा व महायुतीच्या लोकप्रिय उमेदवार पंकजाताई यांनी विकास आणि विश्वासाचे वचन दिलेले आहे त्यामुळे जिल्ह्यातील सर्वच जाती धर्माची जनता ही पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन लाखोंचे मताधिक्य देऊन विजयी करेल आणि विरोधकांना त्यांची जागा दाखवून देईल.

चौसाला जिल्हा परिषद गटात भारतीय जनता पार्टीचे अनुसूचित जाती मोर्चाचे बीड तालुका अध्यक्ष पवन कुचेकर यांच्यासह भाजपा अल्पसंख्य मोर्चाचे तालुका अध्यक्ष सलीम जहाँगिरदार यांचयासह भाजपा व महायुतीचे कार्यकर्ते या सर्वांना सोबत घेऊन चौसाळा जिल्हा परिषद गटात पवन कुचेकर डोअर टू डोअर प्रचार करत आहेत. आणि जनतेचाही चांगला प्रतिसाद मिळत आहे.

## पत्रकार सुभाष चौगले यांना प्रेरणा फाऊंडेशनचा माणुसकी रत्न पुरस्कार प्रदान

वादळवार्ता/राधानगरी
प्रेरणा फाउंडेशन कल्याण मुंबईचा राज्यस्तरीय माणुसकी रत्न पुरस्कार (२०२४) अनंतशाती राधानगरी तालुका अध्यक्ष सुभाष चौगले यांना नुकताच प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार कार्यक्रम आचार्य प्र के. अत्रे नाट्यमंदिर कल्याण मुंबई येथे पार पडला.

सुभाष चौगले गेले २० वर्षे सामाजिक क्षेत्रासह अन्य सर्व क्षेत्रात महत्वपूर्ण कामगिरी करत आहेत.अनंतशाती संस्थेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले आहेत.त्यांच्या कार्यासाठी अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.



या वितरण सोहळ्यास फाउंडेशनच्या अध्यक्षा अभिनेत्री प्रेरणा गावकर, शिवाजी विद्यापीठ एन. एस.एस.विभाग प्रमुख डॉ स्मिता गिरी, महिती अधिकारी संजीव जैन, समावेशक अधिकारी होमगार्ड प्रशिक्षण मुंबई आकाश वाणी मुंबई गायक रघुनाथ फडके, ऑल इंडिया अन्टी करप्शन मुंबई मोहन कदम, अभिनेता चिन्मय मायदेव,गुरुनाथ तिरपणकर,यांच्यासह दिग्गज मान्यवर उपस्थित होते



बीड लोकसभा 233-परळी मतदारसंघातील सिरसाळा येथील (ता. ०९) गुरूवार रोजी मतदान केंद्रावर पहाणी करताना डॉ सिमा जगताप उप आयुक्त औरंगाबाद सोबत परळी तहसील कार्यालयाचे नायब तहसीलदार बी.एल.रुपनर साहेब, मंडळ अधिकारी सुरेवाड साहेब सिरसाळा सज्जाचे तलाठी एरंडे साहेब व जिल्हा बीएलओ आदी छायाचित्रात दिसत आहेत.

## मोतीबिंदू शास्त्र क्रिया मध्ये उत्कृष्ठ काम करणाऱ्या डॉक्टर, कर्मचाऱ्यांचे बीड ज़िल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडून सत्कार

(बीड प्रतिनिधी) मोतीबिंदू शास्त्र क्रिया मध्ये वर्ष 2023-24 या कालावधीत बीड ज़िल्हा रुग्णालय महाराष्ट्रात पहिल्या दहा मध्ये कुठलेही काम करत असतांना ते कोणा एकाला शक्य नसते ते सर्वांनी मिळुन केले तरच ते काम यशस्वी होवु शकते. महाराष्ट्र शासनाने वर्ष 2023-2024 यावर्षी महाराष्ट्रात सर्वात जास्त मोतीबिंदू नेत्रशस्त्रक्रिया केलेल्या पहिल्या दहा नेत्रतज्ञांची यादी जाहीर केली त्यामध्ये बीड जिल्हारुग्णालयातील नेत्र विभागातील नेत्रतज्ञ डॉ.राधेशाम जाजु व डॉ.चंद्रकांत वाघ यांची नांवे आहेत. डॉ.राधेशाम जाजु व डॉ.चंद्रकांत वाघ यानी भरपुर प्रयत्न करुन,अनेक अडचणींना तोंड देवुन,कुठलाही स्वार्थ न पाहता गरीब सर्वसामान्य नेत्ररुग्णांना मनोभावे जे दृष्टी देण्याचे महान कार्य पाहुन त्यांचा बीड जिल्ह्याचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक बडे यांनी सत्कार केला. तसेच नेत्रशस्त्रक्रिया दरम्यान त्यांना मदत करणारे बीड जिल्हा रुग्णालयातील नेत्रचिकीत्सा अधिकारी श्री. सुनिल हरिदास,ग्रामीण रुग्णालय केज येथील श्री.एस.पी.रामपुरकर,ग्रा.रुग्णालय गेवराई येथील श्री.जीवन काळे आणि बीड नेत्रविभागातील इन्चार्ज श्रीमती प्रतिभा शिंगाडे,ओटी असिस्टंट सत्तार मामा यांचाही मा.जिल्हा शल्यचिकित्सक श्री.अशोक बडे यांनी शाल,श्रीफळ व प्रमाणपत्र देवुन सत्कार केला. तसेच नेत्रविभागात नव्याने रुजु झालेले जिल्हा नेत्र शल्यचिकित्सक डॉ.इरफान शेख यांचाही सरांनी हा उत्कृष्ट काम करणा-या डॉ व कर्मचाऱ्यांचा सत्काराचा कार्यक्रमाचे नियोजन केल्याबद्दल अभिनंदन केले. या कार्यक्रमाला डॉ.तांदळेसर,डॉ.पारखेसर,डॉ. प्रदीप सानपसर डॉ.आळणेसर,डॉ.घोळवे मॅडम डॉ.गालफाडेसर डॉ.सीमा राठोड डॉ.शमशादसर आणि जिल्ह्यातील सर्व नेत्रचिकीत्सा अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



